
मेळघाट
पलाश

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# मेळघाट

(कथा)

## लेखक : पलाश

शंतनू कुलकर्णी

# मेळघाट

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मेळघाट

लेखक : पलाश

Shantanu Kulkarni

email id:shantanu96@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ एप्रिल २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## ओळख

नमस्कार माझं हे प्रकाशित होणारं पहिलंच पुस्तक.वाचनाचा आणि लिखाणाचा छंद मला शालेय जीवनातच लागला.साहसी कथा आणि प्रवासवर्णने ही नेहमीच माझ्या आवडीची राहिलेली आहेत. निसर्गाशी जवळीक साधणारं साहित्य हे नेहमीच मला आपलेपणाचं वाटत आलेलं आहे त्यामुळे माझ्या लेखनात सुद्धा त्याचा प्रभाव जाणवल्याशिवाय राहणार नाही.मला जंगल कथांचं वेड लागलं याच कारण म्हणजे मारुती चितमपल्लींच्या गोष्टी.या कथा आपण शहरात असलो तरी मनाला मात्र जंगलात रममाण करतात....

यापुढेही वेगवेगळया विषयांवर लिहीत राहण्याचा माझा मानस असून लवकरच एक कवितासंग्रह सुद्धा प्रकाशित करण्याचा विचार आहे

पलाश



## मनोगत

योग्य आणि अयोग्य निर्णयांनी सतत बदलणाऱ्या आपल्या समृद्ध आयुष्यात न बदलणाऱ्या ज्या मोजक्या गोष्टी आहेत त्यापैकी एक म्हणजे लहरीपणा .प्रत्येक माणूस थोडा का होईना लहरी असतो अगदी मेळघाटाच्या जंगलासारखा..अशाच लहरी लोकांची हि गोष्ट मी आज तुमच्या समोर मांडत आहे . माझी ही लघुकथा तुमच्यापर्यंत पोहोचवण्याची संधी दिली याबद्दल मी ईसाहित्य प्रतिष्ठाण चे खूप खूप आभार मानतो आणि मला लिखाणाला प्रोत्साहित केल्याबद्दल सुनील सामंत सरांचे देखील आभार मानतो.

पलाश

अर्पण पत्रिका

ज्याच्या प्रत्येक क्षणात विलक्षण असा आनंद आणि वेगळेपण आहे अश्या निसर्गाला आणि मला निसर्गाचे वेडं लावणाऱ्या मारुती चितमपल्लींसारख्या तमाम लेखकांना.

## 1

हॅलो पवन कोकणात समर कॅम्प आहे येशील का?

अरे मी तुला सांगायचं विसरलो कालच मी माझ्या मामाकडे आलोय सुंदरबनात

अरे यार काय तू पण.. मी आणि भूमी जातोय तिची एक मैत्रीण पण येतीय, तू पण आला असता तर मजा आली असती.

हो रे पण आता काय करणार? माझ्यासारखे बरेच मित्र भेटतील तुम्हाला. तुम्ही एन्जॉय करा.

जगात तुझ्या सारखा कुणी आहे तरी का पवन? ? मी हसत हसत विचारले. कुणीतरी नक्कीच असेल बघ, पवन गंभीरपणे म्हणाला.

अरे कुठेस तू? ट्रेन गेल्यावर येणार आहेस का? मला झालेला उशीर पाहून भूमी चिडली होती.

अगं बस 2 मिनिट पोहोचलोच आहे. स्टेशनच्या बाहेरच आहे मी.

भूमी प्लॅटफॉर्म वर माझी वाट पाहत होती तिच्याबरोबर तिची खास मैत्रीण गीतांजली सुद्धा होती. किती हा उशीर ट्रेन यायला फक्त 2 मिनिट बाकी आहेत. चुकली असती तर? इतका उशीर का झाला? भूमीचे प्रश्न संपत नव्हते

जरा दम खाशील का?

अगं ट्रॅफिक लागलं म्हणून झाला उशीर. ट्रेन नाही गेली ना बस तर मग...

आमचं संभाषण मधेच तोडत गीतांजली म्हणाली ट्रेन आलीये..

पहाटेचे 4 वाजले होते. आम्ही स्टेशन वर उतरलो. 7 वाजेपर्यंत आम्हाला इथेच थांबावे लागणार होते. मुंबईवरून काही लोक कोकणकन्या एक्सप्रेसने येणार होते. त्यानंतर camp organizer आम्हाला इथून camp site वर नेणार होते. पुण्यावरून मी भूमी गीतांजली आणि अजून आलेले 5-6 जणं इतकेच लोक त्या स्टेशन वर होतो बाकी अंधार आणि निरव शांतता. सगळे आपापली ओळख करून देत होते.

हॅलो मी मिताली. काळया रंगाचा स्कर्ट आणि त्यावर लालसर टॉप घातलेल्या मुलीने ओळख सांगितली. सगळे जण प्रवासाने कंटाळले होते तरी मितालीचा चेहरा प्रसन्न होता दिसायला देखील सुंदर होती. माझं तिच्याकडे असलेलं लक्ष भूमीच्या नजरेतून सुटलं नाही हे मला थोड्याच वेळात कळाल....

Camp organizer स्टेशन वर आले होते. आम्ही कोकणकन्येची वाट पाहत होतो. ट्रेन थोडी लेट झाली होती.

तोवर आम्ही गप्पा मारत होतो. तितक्यात ट्रेन आली. आणि मुंबईवरून आलेल्या लोकांचा ग्रुप उतरला. वेळ न दवडता आम्ही सगळे स्टेशनच्या बाहेर आलो. 4-5 गाड्या बाहेर उभ्याच होत्या. मी, भूमी, गीतांजली आणि मिताली एकाच गाडीत होतो. दीड दोन तास आमचा प्रवास दुतर्फा हिरवीगार झाडे असणाऱ्या वळणदार रस्त्यांवरून चालला होता. अधून मधून एखादं टुमदार गावं दिसायचं. बरं झालं मिताली तू भेटली ते नाहीतर मी कंटाळले असते हे दोघं आता एकमेकांमध्येच गुंतलेले असतील, हो ना ग भूमी? गीतांजलीने विचारले... भूमीने उत्तर द्यायच्या आधीच.. बोलणे तोडत..

मिताली तुझा भूतांवर विश्वास आहे? मी गमतीने विचारलं.

विश्वास तसा नाहीये फारसा पण भुतांच्या गोष्टींची भीती वाटते.. मितालीच उत्तर ऐकून मला हसायला आलं विश्वास नाही तरी त्याची भीती वाटते आश्चर्य आहे.

ते बघ बाहेर प्रत्येक घराबाहेर मोठमोठया काळया बाहुल्या बांधल्या आहेत. घराबाहेर बांधलेल्या काळया बाहुल्या मी पाहिल्यात पण इतक्या मोठया पहिल्यांदाच पाहतेय-

भूमी.

हो मी पण, एकंदरच कोकणात भुताटकी जादूटोणा यावर मोठा विश्वास आहे त्यामुळे protection पण जास्त असावं म्हणून मोठ्या बाहुल्या असतील -मी.

कॅम्प वर पोहोचलो शेवटी एकदाचे, आज पूर्ण दिवस आराम करायचा होता. कॅम्पच्या चहूबाजूंनी हिरवीगार वनराई होती नारळाची पोफळीची उंचच उंच झाड होती त्याखालोखाल वाढलेली आंबेफणसाची राई गर्द पसरलेली. कॅम्प साईट एकदम मस्त होती एकबाजूला टेंट्स त्याच्यासमोर चिऱ्यांचा रस्ता, पुढे मोकळ्या जागेत टेबल आणि खुर्च्या मांडलेल्या, जागोजागी टांगलेले झोपाळे आणि लटकवलेले लँटर्न सगळं मस्त आणि प्रशस्त होतं.

आता मात्र भूक लागलेली, नाश्त्याला खास कोकणी घावन होते. नाश्ता झाला आणि मग सगळ्यांनी आपापली ओळख करून दिली. आता ऊन चढायला लागलं होतं. सगळे जण आपापल्या टेंटमध्ये चालले होते. भूमीला झोप यायला लागली होती. तीही तिच्या टेंटमध्ये जाऊन झोपली मी फ्रेश होऊन बाहेरच्या झोपाळ्यावर पहुडलो होतो. सिंदबादच्या सागर सफरी वाचत. लहानपणापासून मी कितीतरी वेळा वाचलेल्या गोष्टी अजून सुद्धा पुन्हा पुन्हा वाचाव्या वाटतात. इतक्या वेळा संकटात सापडून सुद्धा सिंदबाद पुन्हा पुन्हा सफरींवर जातंच राहतो त्याचा निश्चय ढळत राहतो. मितालीची हाक ऐकू आली झोपला नाही तू? नाही झोप नाही आली मला so पुस्तक वाचत होतो भुतांच्या गोष्टी वाचतोय का मितालीने हसत विचारले? नाही सिंदबादच्या गोष्टी वाचत होतो ये बस ना तू. मिताली शेजारच्या खुर्चीवर बसली.

भूमी आणि गीतांजली कुठे आहेत??

त्या प्रवासाने कंटाळयात झोपल्या लगेच तू नाही झोपलीस?

नाही रे मला दिवसा नाही झोप येत.. बऱ्याच वेळ मी आणि मिताली गप्पा मारत होतो. ती सांगत होती कि तिला फॅशन डिझायनर व्हायचंय तिच्या कपड्यांवरून तिचा फॅशन सेन्स चांगला आहे हे कळत होते.

तुझे कुणी फ्रेंड्स बरोबर नाही आले?

नाही शेवटच्या क्षणाला माझ्या फ्रेंडने कॅन्सल केलं मग एकटीच आले. but now you are with me so माझा वेळ चांगला जाईल. मिताली स्मित करत म्हणाली.

नक्कीच तुला मजा येईल बघ. मी म्हणालो

If you don't mind can i ask something?

मितालीच्या चेहऱ्यावर थोडासा संकोच होता

विचार ना बिनधास्त..

तू आणि भूमी? नाही ते गीतांजली कारमध्ये म्हणत होती....

हो आम्ही relationshipमध्ये आहोत. त्यावरून ती चिडवत होती बाकी काही नाही.. मी हसत हसत म्हणालो...

तुला भूक नाही लागलीय? लंच करायचा का आपण? -- मी

हो चालेल.

दुपारचे अडीच वाजले होते. लंच हॉलमध्ये फक्त आम्ही दोघंच होतो अजून बाकी सगळे झोपेत होते. जेवण करता करता खूप गप्पा होत होत्या मितालीचा स्वभाव खूप मोकळा वाटत होता, आमची ओळख सकाळीच झाली होती तरी ती भरपूर बोलत होती. आमचं जेवण होतं आलं तितक्यात भूमीचा कॉल आला कुठेस तू? लंच नाही करायचा का?

अगं मी लंच हॉल मधेच आहे. माझं जेवण जवळपास झालयं ये लवकर..

भूमी, गीतांजली आणि अजून एक मुलगी लंच हॉलमध्ये आले मिताली आणि मला बरोबर पाहून भूमीच्या चेहऱ्यावर हलक्या आठ्या उमटल्या.

अगं खुप भूक लागली होती आणि तू थकून झोपलेली म्हणून तुला न उठवताच आलो. -मी

बरं केलंस तुम्ही दोघांनी जेऊन घेतलं ते. भूमीचा सूर काही वेगळाच होता.

Hii मी मिताली, भूमी आणि गीतांजली बरोबर आलेल्या मुलीशी हॅण्डहेक करत मिताली म्हणाली.

Hello मी सुरुची तिने आपली ओळख करून दिली.

माझं जेवण होताच मी भूमीला म्हणालो चल मी जरा वेळ आराम करतो आता. थोडी झोप येतेय तुम्ही आरामात जेवण करा. आणि मी माझ्या टेंट कडे निघालो माझ्या मागोमाग मितालीही जेवण आटोपून निघाली...

संध्याकाळी मला जाग आली. मी उठून टेंटच्या बाहेर आलो नुकताच अंधार पडला होता. टेबल वर हलकीशी रोषणाई केली होती. सगळेजण चहाचा आस्वाद घेत होते. मीही भूमी आणि गीतांजलीच्या टेबल वर जाऊन बसलो. गप्पा मारत चहा घेत होतो त्यावेळेस कळालं भूमी मला टाळत होती. ती आणि गीतांजली एकमेकींशी जास्त गप्पा मारत होत्या. काही वेळात आमचा डिनर झाला.

रात्रीचा camp fire त्यात music, songs सगळं इतकं मस्त होत. आमचे camp organizer शैलेश काकांच हे सगळं श्रेय होतं. कॅम्प फायर शेजारी गाण्यांची मैफिल रंगू लागली होती. एका बाजूला भूमी तर दुसऱ्या बाजूला मिताली माझ्या शेजारीच बसलेली होती. भूमी आणि गीतांजलीच्या एकमेकींशी गप्पा सुरु होत्या...

तू का नाही गात? ?

माझा आवाज काही चांगला नाहीये आणि गाण्यांची खूप अशी आवड नाहीये मला-मी.

त्याला काय होतं प्रयत्न तर करून बघ न केलेल्या गोष्टी करायचीच तर इथे आलोय आपण मितालीने गळ घातली.

मी पहिल्यांदा सगळयांसमोर what makes you beautiful गायलं. गाताना माझं लक्ष भूमी कडे होतं कि मिताली कडे याबद्दलची साशंकता भूमीच्या चेहऱ्यावर मला दिसत होती. मिताली मात्र तिच्या फोनमध्ये माझा व्हिडिओ काढत होती.

व्हिडिओ send करशील मी गाण्याचा कार्यक्रम संपल्यावर मितालीला म्हणालो. तिने माझा नंबर घेतला आणि व्हिडिओ send केला

नंतर आकाशदर्शनाचा प्रोग्राम होता. जवळच्या टेकडीवर आम्ही सगळे चालत गेलो रात्री टॉर्चच्या उजेडात पायवाटेवरून चाललो होतो. टेकडीवरून सुंदर दृश्य दिसत होतं, समुद्राची हलकी गाज सुद्धा ऐकू येत होती. इतके सारे तारे खूप दिवसानंतर मी पाहत होतो. पुण्यात ठराविक तारेचं दिसतात ते सुद्धा अस्पष्ट, त्यांच खरं तेज इथे अनुभवायला मिळत होत. eastern horizon वर प्रकट झालेलं मृग नक्षत्र (Orion Hunter ). जिथे तारा जन्मतो असा हा orion nebula. त्याखाली दिसणारा Sirius हा आकाशातील सगळयात तेजपुंज तारा. शैलेश काका माहिती देत होते, सगळंच मस्त होतं, टेकडी वर मस्त शॅक्स टाकलेल्या होत्या, गाणी ऐकत शॅक वर थंड स्मूदी पीत-पीत आमचं आकाशदर्शन सुरू होत त्याचबरोबर खूप मजा मस्ती. आम्ही शोधात असलेला तारा मात्र आज ढगाआड होता बाकी सगळं आकाश निरभ्र होत पण उत्तर क्षितिज ढगाळलेल. त्या मागेच कुठेतरी ध्रुव लपला होता.....

गप्पा गोष्टींमध्ये २ वाजले होते. वेगवेगळया सुंदर अविष्कारांचा आनंद आज मिळाला होता. बऱ्याच मुलामुलींशी ओळखी आणि गप्पा झाल्या होत्या.

आता झोप आवरत नव्हती. खाली येऊन टेंटमध्ये पडल्या पडल्या झोप कशी लागली कळलंच नाही.

सकाळी 7. 30 वाजताच फोन वाजायला लागला. मितालीचा कॉल आला होता.

इतक्या सकाळी उठली पण तू?

हो इथे काय झोपायला आलोय का आपण? चल किनाऱ्यावर जाऊन येऊ. ठीक आहे मी आलोच रेडी होऊन म्हणत मी तयार होऊन बाहेर आलो.

मिताली माझी वाट बघत झोपाळयावर बसली होती. बाजूच्याच टेबलवर सुरुची तिचे फ्रेंड्स मेघना आणि हर्ष यांच्या बरोबर चहा घेत बसली होती. बाकी सगळे अजूनही झोपेच्याच अधीन होते.

त्या तिघांना Hi hello करून मी आणि मिताली किनाऱ्याकडे निघालो कॅम्प साईट पासून जवळपास 2 किमी वर किनारा होता. एक रेखीव पाऊलवाट किनाऱ्याकडे जात होती पाऊलवाटेच्या दोन्ही बाजूंनी गर्द उंच झाडी होती. कॅम्प साईट गावापासून बरीच दूर असल्याने मनुष्य वस्ती जवळपास नव्हतीच. आम्ही गप्पा मारत किनाऱ्याकडे हळूहळू चाललो होतो. मितालीने शॉर्टस आणि शर्ट घातला होता. डोक्यावर एक हॅट आणि डोळयावर गॉगल घातलेली मिताली आज जरा जास्तच सुंदर दिसत होती. आम्ही किनाऱ्यावर पोहोचलो दूरवर पसरलेली पुळण आणि मग डोंगर. पुढे अथांग पसरलेला निळाशार समुद्र होता किनाऱ्यावर फक्त आम्ही दोघचं, अवर्णनीय असंच दृश्य होतं ते. आम्ही दोघही समुद्राचं रूप पाहून भारावून गेलो होतो. पाण्यात शिरून एकमेकांवर पाणी उडवत होतो. किनाऱ्यावर पळत होतो एकमेकांवर वाळू फेकून पुन्हा पाण्यात जात होतो. असं वाटत होतं कि काळ असाच इथे स्तब्ध व्हावा. खेळून खेळून आम्ही थकलो होतो दोघंही किनाऱ्यावर पहुडलो.

मिताली एक सांगू पुढचे 10-15 दिवस रोज असेच असावेत.

तू इतक्या दिवसांचं बुकिंग केलय? मी तर परवाच पुण्याला जातेय.

इतक्या लगेच? - मी

हो क्लासेस सुरु होणार आहेत माझे.

त्यामुळे जी काय एन्जॉयमेंट करायची ती आज आणि उद्याच.

कितीतरी वेळ मी मिताली कडे फक्त पाहत होतो. काळेभोर डोळे, मनमोहक हास्य आणि स्वभावातील सहजता सगळंच काही वेगळं होतं. भूमी वर माझं प्रेम होतंच पण मितालीसाठी सुद्धा एक आकर्षण तयार होत होतं. ती सुद्धा माझ्याकडे फक्त बघत होती.

चल आता परत जाऊया मी उठत म्हणालो. मितालीने माझा हात धरला आणि आर्जवी स्वरात म्हणाली इतक्या लवकर? थोड्यावेळ थांब ना. किती छान वाटतंय इथे.

मी पुन्हा खाली बसलो.

परत पुण्याला गेल्यावर भेटशील का? मी तिला विचारलं

तू फक्त सांग मी कधीही कुठेही भेटेन मिताली सौम्य हसत म्हणाली. एव्हाना भरती सुरु झाली होती आम्ही जिथे बसलो होतो तिथे हलक्या लाटा यायला यायला लागल्या होत्या. एकमेकांकडे बघत असताना मिताली कधी माझ्या बाहुपाशात विसावली ते कळलंच नाही. मी हलकेच तिच्या कपाळावर ओठ टेकवले. बाजूचा समुद्र, किनारा, निसर्ग सगळं काही विसरून आम्ही फक्त एकमेकांत आकंठ बुडालो होतो.

तुला असं वागताना लाज नाही वाटत? मी वळून पाहिलं तर गीतांजली रागात ओरडत होती, तिच्या शेजारी भूमी उभी होती. तिच्या डोळयात फक्त आणि फक्त अश्रू होते. मला कालच संशय आलेला. मी म्हणाले होते ना तुला? गीतांजली भूमीशी बोलत होती. मी सुन्न होतो. काय घडतंय हे मला कळतं नव्हते. मी भूमीच्या जवळ गेलो. मी काही बोलणार तितक्यात ती म्हणाली तुझ्याबद्दल असं आधीपण ऐकलं होतं कॉलेजमध्ये, तरी पण तू चांगला वाटलास म्हणून विश्वास ठेवला मी.

एकदा माझं ऐकून घे भूमी, I'm really sor..

माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच भूमी परत निघाली. तिच्या मागे गीतांजली पळत होती. किनाऱ्यावर त्यांच्याबरोबर आलेले सुरुची, मेघना आणि हर्ष माझ्याकडे आणि मितालीकडे बघत होते. मी त्यांची नजर चुकवत होतो.

मी कॅम्प साईट कडे भूमीच्या मागे जायला निघणार तितक्यात मितालीने माझा हात पकडला.

I'm sorry but आत्ता तू काहीही सांगितलं तरी भूमी ऐकणार नाही, थोडावेळ थांब ती शांत झाली कि आपण दोघं सांगू, ऐकेल ती नक्की. अस म्हणत मिताली पुन्हा मला किनाऱ्याकडे घेऊन गेली. समुद्राला समांतर चालत आम्ही डोंगराच्या दिशेला कितीतरी वेळ चालत होतो. मिताली बऱ्याच गोष्टी सांगत होती मी मात्र वेगळयाच विचारात मग्न होतो.

टळटळीत दुपार झाली होती. ऊन चांगलंच तापलं होतं,

चल आता परत जाऊ खूप भूक लागलीय ब्रेकफास्ट नाही केला आपण, आता लंचची वेळ झालीये. -मिताली.

हो चल भूमीपण शांत झाली असेल तर बोलतो मी तिच्याशी-मी.

आम्ही दोघ कॅम्प साईट वर परतलो तेव्हा सुरुची, हर्ष आणि मेघनाच्या नजरा आमच्यावरच खिळल्या होत्या. मिताली लंच हॉलकडे निघाली.

अगं एकदा भूमीला भेटून येतो मी. तू जा पुढे. असं म्हणत मी भूमीच्या टेंट कडे निघालो टेंटमध्ये कुणीच नव्हतं, शेजारचा गीतांजलीचा टेंट पण रिकामा होता. मी लॉकर मधून माझा मोबाईल काढला त्यावर 5 missed call दिसले. सकाळी बराच वेळ भूमीने कॉल ट्राय केला पण मी मात्र लॉकरमध्ये फोन ठेऊन किनाऱ्यावर मिताली बरोबर एन्जॉय करत होतो. मी callback केला पण तिने काही उचलला नाही. गीतांजली बाबतही तेच झालं. मी कॅम्प साईट सगळी पालथी घातली पण भूमी कुठेच नव्हती. शेवटी camp organizerला विचारलं. तेव्हा कळालं भूमी आणि गीतांजली दोघी परत पुण्याला निघाल्या होत्या. जवळच्या गावातून त्या ST पकडून परत जाणार होत्या. camp organizer कडून एक गाडी घेऊन मी सुद्धा ST स्टँड कडे गेलो. अर्धा तासानंतर स्टँड वर पोहोचल्यावर चौकशी केली तेव्हा कळालं पुण्याची बस काही वेळापूर्वीच निघून गेली. मी रिकामाच कॅम्प साईट वर परतलो.

मिताली झोपाळयावर बसून कॉफी पित होती. सुरुची हर्ष, रोहित आणि मेघना कॅरम खेळत होते. तितक्यात मितालीने आवाज दिला अरे तू नंतर जेवायला आलाच नाही मी कितीवेळ वाट पाहिली. चल सोबत कॉफी घेऊ आपण. सॅन्डविच पण आहेत तिथे, थोडं खाऊन घे.

भूक नाहीये म्हणत मी टेंट कडे निघालो. मिताली पुन्हा झोपाळयावर कॉफीचा आस्वाद घेऊ लागली.

माझं डोकं सुन्न झालं होतं. याआधी सुद्धा timepass relationship बरेच झाले होते पण तेव्हा त्या मुली सुद्धा relationship बाबतीत फारश्या serious नसायच्या भूमी मात्र तशी नव्हती, तिच्या सगळया भावना माझ्यात गुंतल्या होत्या, हे मला माहिती होत तरी सुद्धा माझ्याकडून ही चूक घडली होती. कदाचित आधीही कुणी सिरीयस असेल पण मला समजलंच नसेल. या अनुभवानंतर मी पुरता भांबावून गेलो होतो. याआधी ब्रेकअप झाले पण त्यामुळे मी अजिबात भांबावलो नव्हतो. हा अनुभव खूपच वेगळा होता. एक अपराधी भावना माझ्या मनात होती. पण काय करावं हे सुचत नव्हतं. रात्र झाली होती. मोबाईलची रिंग वाजत होती मितालीचा कॉल होता. मी तो कॉल उचलला नाही.

मी मोबाइलमध्ये आमचे काढलेलं फोटो बघत होतो, सगळया आठवणी डोळयासमोर येत होत्या. कॉलेज मधली आमची पहिली भेट- पवनने तिची आणि माझी करून दिलेली ओळख. पुढे मैत्री वाढत जात एकमेकांवर जडलेलं प्रेम हे सगळं संपलं होत. रात्रभर मी जागा होतो. सकाळी 6च्या आसपास माझा डोळा लागला

सकाळी 11च्या आसपास मी उठलो. मोबाईल वर मेसेज होता मी सकाळीच पुण्याला परत निघाले. तुझ्याबरोबर कॅम्पमध्ये खूप मज्जा आली. नशिबात असेल तर पुन्हा असेच भेटू एकदा- मिताली.

या मेसेजला द्यावे असं उत्तर माझ्याकडे नव्हते. मी बाहेर येऊन बसलो. सगळे वेगवेगळया ऍक्टिव्हिटीमध्ये व्यस्त होते. काहीजण नुकतेच किनाऱ्यावर जाऊन परत टेंटमध्ये चालले होते.

अरे चेहरा किती सुजलाय तुझा? बरं नाही वाटतंय का? रोहितने माझ्याकडे पाहून विचारलं.

अरे नाही बरं वाटतंय, काल झोप नाही झाली त्यामुळे असेल maybe.

मी झोपाळयावर पडून राहिलो. अजूनही माझं मन बधिर होतं. इथे बोलायला सुद्धा कुणी नव्हतं.

शेवटचा पर्याय होता पवन.

मी पवनला कॉल केला.

काय कशी सूरु आहे एन्जॉयमेंट? कॉल उचलताच पवन सुरु झाला. ऐक पवन तुझ्याशी जरा बोलायचं आहे.

जरा एक मिनिट थांब म्हणत पवनने कॉल कट केला आणि लगेच त्याचा व्हिडिओ कॉल आला. मी उचलताच म्हणाला काय तिथेपण उशिरा उठतोय? चेहरा बघूनच कळतंय.. अरे तिथे लवकर उठून जरा फिरत जा...

पवन जरा माझं ऐकशील का?

एका अटीवर, जरा मला कॅम्प साईटचा 360 view दे.

पवन याशिवाय ऐकणार नव्हता. मी मोबाइलचा बॅक कॅमेरा सुरु केला आणि सगळी कॅम्प साईट दाखवायला लागलो. तितक्यात पवन म्हटला थांब थांब जरा त्या पुढच्या मुलीला फोन दे.. मी या मनस्थितिमध्ये असताना पवन मात्र मस्तीच्याच मूडमध्ये होता.

काहीपण काय? माझ्याशी बोल आता.

नाही आधी तिला फोन दे मला तिच्याशी बोलायचं आहे.

बहुतेक त्याला सुरुची आवडलेली. पण तो देखील फोन वर काय बोलेल याचा नेम नव्हता. आधीच माझे कारनामे तिला माहित होते. त्यामुळे मी हे धाडस करणार नव्हतो.

पवनशी आत्ता बोलण्यात काही अर्थ नाही म्हणून मी कॉल कट केला, आणि झोपाळयावर पुन्हा झोपलो. काही वेळातच सुरुची तिथे आली आणि म्हणाली हे घे पवनला तुझ्याशी बोलायचं आहे. कालपासून मला धक्क्यावर धक्के मिळत होते त्यात हा काय प्रकार हे मला समजत नव्हतं.

मी नुसताच तिच्याकडे अर्थबोध न झाल्या सारखा पाहत होतो

तिने फोन माझ्या हातात दिला.

काय रे फोन का कट केलास. मी म्हणत होतो ना तिला फोन दे म्हणून... पवन बोलतच होता.

तू ओळखतो हिला?

हो त्यामुळेच तर म्हणत होतो दे फोन म्हणून. माझी स्कूल फ्रेंड आहे सुरुची. 10 वीपर्यंत बरोबरच होतो आम्ही.

बरं तू कश्यासाठी कॉल केला म्हणत होतास?

मी गड्बडलो होतो काही नाही सहजच केला होता रे. बोल सुरुचीशी म्हणत मी तिला फोन परत दिला. तिच्या चेहऱ्यावर हलकंसं स्मितहास्य होतं. ती पवनशी बोलत परत गेली. काही वेळात पवनचा पुन्हा कॉल आला तू काहीतरी बोलणार होतास ना रे? मग अचानक का बंद केलास कॉल नंतर? सुरुची होती म्हणून बोलला नाही का??

अरे नाही तसं काही नाहीये. सहज केला होता कॉल. तू असता इथे तर बर झालं असतं.

सुरुची त्याची मैत्रीण आहे हे कळाल्यावर मी पवनला जे काही सांगायचे आहे ते नाही सांगू शकलो. माहित नाही का पण नाही सांगू शकलो.

पवन पलीकडून बोलतंच होता. बघ मी तुला म्हणालो होतो ना माझ्यासारखं कुणीतरी भेटेल. तुला सुरुची भेटली बघ.

मला खात्री आहे तुमच्या खूप गप्पा होतील आणि चांगली मैत्री पण होईल तुमची

मी फक्त hmm म्हणालो. बहुतेक तरी सुरुचीने घडला प्रकार पवनला सांगितलेला नव्हता. पवनच्या बोलण्यावरून मी तसाच अंदाज बांधला.

कॉल संपल्यावर मी विचार करत होतो. सुरुची जेव्हा हे सर्व पवनला सांगेन तेव्हा त्याची काय प्रतिक्रिया असेल? ती काय काय सांगेन, कशाप्रकारे सांगेन तितक्यात सुरुची चहाचा कप घेऊन येताना दिसली मी उगीचच नजरानजर टाळत होतो. ती शेजारच्या खुर्चीत बसली आणि चहाचा कप माझ्या समोर केला चहा घेणार?

नाही थँक्स-मी.

पवनचा कॉल आला होता मला. आत्ता परत. तुझचं कौतुक सांगत होता. तुम्ही एकाच कॉलेजमध्ये ना? मी त्याची स्कूल फ्रेंड आमची चांगली मैत्री होती शाळेत. तुझ्याबद्दल तो बरंच सांगत होता. त्याच्यासारखीच तुला पण प्राणीपक्षांची आवड आहे म्हणे? तुमच्या आवडीनिवडी जुळतात तर सुरुची विचारत होती.

हम्म त्यामुळेच तर आम्ही मित्र झालो. हे बघ सुरुची तुझा रोख लक्षात येतोय माझ्या पण खरं सांगायचं झालं तर पवन खरंच चांगला मुलगा आहे आणि मी अजिबात चांगला नाहीये हे मी मान्य करतो. त्याच्या चांगुलपणामुळे त्याला माझे कदाचित फक्त चांगले गुण दिसत असावेत बाकी पवन अजिबात माझ्या सारखा नाहीये. मी सांगत होतो आणि सुरुची शांतपणे ऐकत होती.

हे बघ मी पवनला खूप वर्ष जवळून पाहिलंय त्याने जे सांगितलं ते नक्कीच खोटं असणार नाही. मी पवनला चांगली ओळखते. पण जे मी पाहिलं आणि जे पवनने सांगितलं त्याचा मेळ बसतोय पण आणि बसतही नाही. तू जे भूमी बरोबर केलं ते मला अत्यंत चुकीचं वाटलं. गीतांजलीची वाक्य पण बरोबर वाटली मला. कि तू निव्वळ मजामस्ती म्हणून भूमी बरोबर relationमध्ये होतास, पण मी नंतर निरीक्षण केलं तू तिला शोधत होतास.. तिच्यासाठी व्याकुळ होतास. तिला शोधायला गाडी घेऊन गेलास. परत आल्यावर मिताली बरोबर काही खाल्लं नाही, डिनरला पण तिच्याबरोबर दिसलं नाही, रात्रभर उपाशी राहिला. चेहरा पण सांगतोय कि झोपला नाहीस. फक्त मजामस्ती असती तर भूमी गेल्यावर तू इतका बेचैन नसता झालास. पण काल सकाळी जे केलं त्यावरून परत confusion होतंय. पण पवनच्या बोलण्यावरून अंदाज आला मला तू वाटतो तितका वाईट नक्कीच नाहीयेस.. सुरुची हळुवार बोलत होती.

भ्रम आहे तुझा सुरुची. असले अंदाज नको काढूस काही. मी जे काही केलं त्यामुळे भूमीला प्रचंड त्रास झाला असणार.. मी बोलतंच राहिलो माझ्या आधीच्या घडलेल्या चुका अव्याहतपणे आपसूक सांगतच राहिलो आणि सुरुची शांतपणे ऐकत राहिली.

चहा नाश्ता करून घे. तू कालपासून उपाशी आहेस म्हणत तिने चहा आणि पोहे दिले. सुरुचीशी बोलल्यावर माझं मन काहीस हलकं झालं होतं. मेघना काहीतरी कारणाने सुरुचीला तिथून घेऊन गेली. माझ्यापासून तिनं जरा लांब राहायला पाहिजे असेच भाव तिच्या चेहऱ्यावर होते. मी पुन्हा टेंटमध्ये जाऊन झोपलो...

कॅम्पचे शेवटचे दोन तीन दिवसच राहिले होते. रोहित बरोबर चेस खेळायचा आणि सुरुचीशी गप्पा व्हायच्या. हाच दिनक्रम माझा झाला होता. ती कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता आता गप्पा मारायला लागली होती. मेघना मात्र अजूनही माझ्याकडे संशयी वृत्तीने पाहत असे....

वाट जवळ जवळ संपत आली होती पण गप्पा मात्र संपण्याची चिन्ह दिसत नव्हती अर्थात तशी माझी इच्छा सुद्धा नव्हती

वाट संपली आणि पुढे दिसला किनारा, अथांग समुद्राच्या सतत बरोबर असणारा त्याची अनेक रहस्य दडवणारा.

मला आमच्या गप्पा सुद्धा अशाच वाटायच्या अथांग पण नितळ. असं फक्त सुरुची बरोबरच व्हायचं तिच्याशी गप्पा मारताना वेळेचं भान राहायचं नाही. एकदा गप्पा सुरु झाल्या कि गमती जमती पासून तर तत्वज्ञान, निसर्ग, तंत्रज्ञान सगळे विषय निघायचे. गप्पा सुरु होताना 5-6 जण असले तरी संपताना आम्ही दोघंच उरणार हे आता मागच्या अनुभवावरून माहिती असायचं

तो सी-गल आहे ना? सुरुचीनं किनाऱ्यावर विसावलेल्या थव्याकडे बोट दाखवून विचारलं, हो सिल्व्हर सिगल आहे तो हजारो किमीचा प्रवास करून इकडे दर हिवाळयात येतो मी म्हणालो.

कमाल आहे नाही? दरवर्षी नेमाने इतक्या दूरवर येतात हे पक्षी आणि न चुकता पुन्हा आपल्या मूळ स्थानी परत जातात - सुरभी.

माणसांचं तरी वेगळं कुठयं सुरुची कितीही लांब जाऊदे येतात परत मूळ ठिकाणीच नाही का? फक्त तीमध्ये चुकतात इतकाच काय तो फरक

मावळतीच्या रंगांनी पश्चिम क्षितिज व्यापलं होत. आजही सूर्याला मोजक्या ढगांनी दडवलं होतं, समुद्राला ओहोटी लागली होती आणि आमची परतीची वेळ झाली होती....

पुण्याला परतून 2 महिने झाले होते. भूमीला भेटण्याचे सगळे प्रयत्न विफल झाले होते. त्यादिवसानंतर मी बऱ्याच वेळा कॉल केला सुरुवातीला तिने उचलला नाही नंतर मात्र माझा नंबर ब्लॉक केला होता..

माझं रुटीन आता बऱ्यापैकी बसलं होतं पण आता पहिल्यासारखं मनमोकळेपणाने कुणाशी जास्त बोलू शकत नव्हतो. पवन अपवाद होता पण त्याच्याशी माझ्या जास्त चर्चा तर निसर्गावरच होत होत्या. असाच एकदिवस पवनचा कॉल आला. मुंबईतल्या निसर्ग संवर्धन संस्थेने शनिवारी कांदळवनांबद्दल एक कार्यक्रम आयोजीत केलाय येतोय का? नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. शनिवारी मी आणि पवन दोघही डेक्कन क्वीनने मुंबईला पोहोचलो. स्टेशन बाहेर येताच पवन थांबला..

काय रे काय झालं? अरे सुरुची कॅब घेऊन येतीय. हे surprise पवनने मला इथपर्यंत सांगितलं नव्हतं. काहीवेळातच सुरुची कॅब घेऊन पोहोचली आणि आम्ही कांदळवनांकडे निघालो

कार्यक्रम अगदी मस्त झाला निसर्ग साखळीमध्ये कांदळवनांचं महत्व, त्सुनामी पासून रक्षण, त्यांच्या मुळांची ठेवण याबद्दल मार्गदर्शक भरभरून बोलत होते. या वनांचा ऱ्हास आणि त्याचे परिणाम सांगत होते. आमचा पूर्ण दिवस यातच गेला. निघावस वाटत नव्हतं पण ट्रेनची वेळ जवळ आली होती.

कुठेस तू? मला लगेच भेटायचं आहे तुला. पवन पलीकडून न थांबता बोलत होता. तो नेहमी असाच असायचा पण आज काहीतरी वेगळाच उत्साह त्याच्या आवाजात दिसत होता.

अरे मी घरीच आहे, बोल ना..

फोन वर नाही समोरासमोर बोलू मी येतोच तुझ्या घराच्या इथे, तयार रहा आपल्याला बाहेर जायचंय

मी तयार होऊन बिल्डिंग खाली उतरत नाही तोच पवन गाडी घेऊन पोहोचला सुद्धा..

गाडीत बसत मी विचारलं आता तरी सांग,

नाही आधी पोहोचू तर दे -पवन.

कुठे चाललोय आपण?

कळेल थोड्यावेळात पवनच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता, इतका exited त्याला मी कधीच पहिला नव्हता.

हॅलो सुरुची मी आलोय ये खाली. पवनने एका ठिकाणी गाडी थांबवत सांगितले.

सुरुची इथे कशी काय ती मुंबईला राहते ना? -मी

हो तिचे आजी आजोबा इथे राहतात त्यांच्याकडे आलीये. पवन सांगत असतानाच सुरुची पण गाडीत बसली

काय अरे अस अचानक काय सांगायचं आहे? एवढ्या घाईघाईत बोलावलंस सुरुची पवनला विचारत होती पण तो काही सांगायच्या मूडमध्ये नव्हता आम्हा दोघांना अजून अधीर ठेवण्यात त्याला मजा येत होती

गाडी सिंहगड रस्त्याला लागली तासाभरात आम्ही सिंहगडावर होतो.

आतातरी सांगशील का? मी आणि सुरुची दोघांनी एकदम विचारले

मी फॉरेस्ट ऑफिसर झालो पवनच्या चेहऱ्यावरचा आनंद काही औरच होता. लहानपणापासून पाहिलेलं स्वप्न त्याने पूर्ण केलं होतं. आमच्याही आनंदला उधाण आलं होतं. पवन सांगतच होता लवकरच ट्रेनिंग सुरु होणार आहे मेळघाटात. पवनच्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळत होते. मी आणि सुरुची निशब्द आणि स्तब्ध होतो....

पवनला जाऊन बरेच दिवस झाले होत. पवन जंगलात रमला होता. हळूहळू पवनशी कॉन्टॅक्ट कमी झाला होता, आता महिन्या-दोन महिन्यातून एखाद्या वेळेस फोन वर बोलणं होतं असे आमचं त्यातही जंगलातल्या सुरम्य कथा पवन सांगत राही.

सुरुची पुण्याला आली कि भेटत असे. हळूहळू माझी आणि सुरुचीची मैत्री वाढत होती. भेट नाही झाली तरी फोन वर संभाषण झाल्याशिवाय राहायचं नाही. पवन मात्र तिला आता विसरला हाच तिचा समज झाला होता कारणही तसंच होतं गेल्यानंतर पवनने तिला एकदोनदाच कॉल केलेला हळूहळू त्याचे कॉल बंद झाले होते. मला मात्र अजूनही 2-4 महिन्यात एखादा कॉल नक्की येत असे.

असंच एकदा सुरुची पुण्यात आलेली. कॉफीशॉपमध्ये बसून कित्येक तास आमच्या गप्पा सुरु होत्या. तितक्यात आमच्या बाजूच्या टेबल वर एक ग्रुप बसला. त्यांचा आवाजही बराच होता. तिकडे बघितलं तर आश्चर्याचा धक्का बसला त्याच टेबल वर मिताली बसली होती. आजवर मी तिला कधी पुन्हा संपर्क करण्याचा प्रयत्न केला नाही तिनेही पुण्यात परत आल्यावर संपर्क केला नव्हता. माझी आणि मितालीची नजरानजर झाली. तिच्या चेहऱ्यावर गोंधळलेले भाव उमटले पण क्षणातच तिने जणू ओळख नसल्यासारखे पाहून न पाहिल्यासारखे केले. याबद्दल मात्र मला आश्चर्य वाटले नाही, सुरुची सुद्धा हे पाहत होती. काही क्षण आमच्या टेबल वर शांतता होती

तू पवनला काहीच नाही सांगितलं माझ्याबद्दल कशामुळे? मी शांतता भंग करत सुरुचीला विचारले.

माहित नाही पण नाही सांगू शकले तेव्हा. नंतर सांगावं असं कधी वाटलं नाही. मितालीच्या येण्याने आमच्या संभाषणाची लिंक तुटली होती आणि ती असताना लिंक लागण्याची शक्यताही नव्हती म्हणून मग मी सुरुचीचा निरोप घेतला आणि घरी परतलो..

पानगळ सुरु झाली होती, रस्त्यांवरून चालताना एखादं पान हलकेच गळून खाली पडत होतं... तितक्यात पवनचा फोन आला.

अचानक दुपारी फोन खणखणला आणि नुकतीच यायला लागलेली झोप चाळवली गेली काहीश्या नाराजीनेच मी फोन उचलला. अरे दिवस रात्र झोपून कंटाळा नाही येत का तुम्हा शहरातल्या लोकांना? पवनने आपला सूर लावला. दुपारी हे विचारायला फोन केलाय का - मी.

एक इंटरेस्टिंग बातमी आहे तू कधी येतोय इकडे? ? पवनने विचारले

काय बातमी आहे आणि इकडे म्हणजे कुठे? तू कधी एका जागी असतोस का पवन?

अरे मेळघाटात आहे मी, C1 आलाय इकडे शक्य तितक्या लवकर ये किती दिवस राहील माहित नाही पवन उत्साहात सांगत होता. आता माझीही झोप उडाली होती. C1 म्हणजे तोच वाघ ना 5 महिन्यात 1300 किमी फिरला होता? ?

हो अरे इकडे C1 इतका फिरतोय वाघ असून आणि तुम्ही तिकडे झोपा काढताय. पवन आज एकही चान्स सोडणार नव्हता.....

ट्रेनचा प्रवास संपला होता आणि आता गाडीने मी सेमाडोह कडे निघालो होतो, luckily तात्काळ कोट्यात बुकिंग मिळालं होतं पण मी पवनला याची काहीच कल्पना दिली नव्हती अचानक जाऊन कुणाला धक्का देण्यात एक वेगळीच गम्मत आहे.

दीड वर्षाने आम्ही भेटत होतो... मला बघताच हसत हसत भेटून पवन म्हणाला- अरे तुझीच वाट बघत होतो केव्हाची,

खरंतर आश्चर्याचा धक्का मी देणार होतो पण झाले उलटेच,- तुला कुणी सांगितलं मी आज येणार होतो ते?

तो हसत राहिला...

माझ्या आणि सुरुची शिवाय कुणालाच हे माहित नव्हतं त्यामुळे मी पुन्हा विचारलं - सुरुचीचा फोन आला होता का तुला? माझ्या चेहऱ्यावरचे भाव पाहून शेवटी त्याने उत्तर दिलं नाही रे. इथे 20-30 किमीच्या आसपास तरी मोबाईलला रेंज येत नाही आणि landline सगळे बंद पडलेत, cable cuttingचा प्रॉब्लेम येतो इथे सारखा. तुला फोन करायचा म्हणून चिखलदऱ्याला गेलो होतो तेव्हा कुठे रेंज मिळाली. तुझ्या बोलण्यावरूनच कळालं तू लगेच येणार पण आज पण महाराष्ट्र एक्सप्रेस थोडी लेट झाली वाटतं नाहीतर इथे 4-4. 30पर्यंतच पोहोचला असता तू.

ट्रेनच्या टायमिंग पासून माझ्या स्वभावापर्यंत सगळेच ठोकताळे पवनने बरोबर मांडले होते. डोर्मिटरीच्या समोर बसून आम्ही सूर्यास्त होईपर्यंत गप्पाच मारत होतो. एकदा का जंगलकथा सुरु झाल्या कि आमच्या गप्पांना वेळकाळाचे काही भान राहत नसे. शेवटी गार्डने आम्हाला चहाची आठवण करून दिली.

सुरुची काय म्हणतेय?- पवनने चहाचा घोट घेत विचारलं.

ती पण यायचं म्हणतेय मेळघाटात --मी.

पवन हसत हसत म्हणाला- मस्करी बास झाली रे. मी सिरिअसली विचारतोय.

अरे खरंच येणार आहे ती तिची परिक्षा संपतेय उद्या, 2 दिवसांनी ती पण येईल इथे.

अरे यार.. पवन जरा नाखुषीनेच म्हणाला

काय रे काय झालं तिला बोलवायला नको होतं का?

अरे तसं नाही मी परवापर्यंतच आहे इथे आमची भेट नाही होऊ शकणार म्हणून तसं म्हणालो.

हा पुन्हा मला धक्का होता. तू जाणार आहेस तर मला का बोलावलंस इथे मी काहीश्या नाराजीनेच विचारलं.

मी तुला जंगल बघायला बोलावलंय ते तर तू मी नसतानाही बघू शकतोच की तुझी सगळी व्यवस्था केलीये मी इथे, काळजी करू नको.

आमचं बोलणं सुरु असतानाच अजून एक मुलगा तिथे आला. फॉरेस्ट डिपार्टमेंटच्या वेशातच होता तो त्याच्याशी माझी पवनने ओळख करून दिली हा माझा मित्र राक्कु. राक्कु तिथे वनरक्षक होता. तिथल्या आदिवासीं पैकीच तो होता. त्याला जंगलाची खडा न खडा माहिती होती. राक्कुशी ओळख झाल्यावर तो निघून गेला आणि आमच्या गप्पा सुरु राहिल्या.

आता सगळीकडे काळोख पसरला होता गार्डने शेकोटी पेटवली होती तरीही थंडावा जाणवू लागला होता. आणि भूकही लागली होती. जेवण झाल्यावर पवन म्हणाला चल बाकीच्या गोष्टी उद्या करू. आता झोप सकाळी लवकर उठायचं आहे ... आम्ही कॉटेजमध्ये झोपायला गेलो. कॉटेज एकदम छान होतं. सोलर लाईटची 24 तास सोय होती तिथे. अंथरुणावर पडल्यावर झोप कधी लागली कळलंच नाही...

सकाळीच 7 वाजताच पवनने जोरजोरात उठवले आणि म्हणाला चल चिखलदऱ्याला जायचं आहे आपल्याला. आम्ही तयार होऊन चिखलदऱ्याकडे गेलो.

पंचबोलवरून सातपुड्याच्या रांगांचा नजारा दिसत होता. खोल दरी आणि दूरपर्यंत पसरलेलं पानझडीचं जंगल होतं. त्यानंतर कॉफीच्या बागांना भेट दिली. महाराष्ट्रात कॉफीची लागवड फक्त इथेच होते हे एक चिखलदऱ्याचं वैशिष्ट्य -पवन माहिती देत होता.

सगळे पॉइंट्स फिरून झाल्यानंतर आम्ही गाविलगड किल्यावर गेलो, गाविलगडाचा शार्दुल दरवाजा भव्यतेची साक्ष देत समोर उभा होता. महाराष्ट्रात क्वचितच दुसऱ्या गडावर एवढा भव्य दरवाजा असेल. निसर्ग आणि इतिहास याचा सुंदर मेळ आम्ही इथे अनुभवत होतो. पवनला मेळघाटाचा सगळा परिसर माहित होता, वनाधिकारी होण्यावेळी प्रशिक्षणाचा बराच काळ तो मेळघाटात होता. पवन मेळघाटाबद्दल भरभरून बोलत होता. तो फक्त वनाधिकारी नव्हता तर एक चांगला निसर्ग संशोधक सुद्धा होता. संध्याकाळ होण्याच्या आत आम्ही सेमाडोहच्या संकुलात परत आलो.

सकाळी उठायला मला 11 वाजले, अंग अगदी जड झालं होतं. कालचं फिरणं आणि रात्री उशिरापर्यंतच्या गप्पा याचाच हा परिणाम होता शेजारच्या बेड वर बघितलं तर पवन तिथे नव्हता. बाहेर येऊन पाहिलं डोर्मिटरीच्या आवारातही कुठे दिसला नाही इतक्यात गार्डला विचारलं तर त्याने सांगितलं, साहेब सकाळीच गेले परत .. परत गेले म्हणजे कुठे गेले? सध्या राजाजी पार्कला पोस्टिंग आहे त्यांची, तिथेच गेले. त्यांचं इथलं काम कालच संपलं म्हणाले...

काय? तो तर उद्या जाणार होता आजच कसा निघाला? हा परत अजून एक मोठा धक्का होता. मागच्या काळातील घटनाक्रम माझ्या समोर होता दोन तीन महिन्यांपूर्वी माझं आणि पवनचं फोन वर बोलणं झालेलं आणि मेळघाटाचा विषय निघताच त्याला मी म्हणालो होतो, मेळघाट आणि माझा मेळ काही बसत नाहीये कित्येक दिवसांपासून प्लॅन करतोय पण तो वर्कआऊट होत नाहीये. यामुळे पठ्ठ्याने हा सगळा घाट घातला होता, आणि मला मेळघाटात सोडले होते, स्वतः शासकीय कामासाठी तो मेळघाटात आला होता. C1चे फक्त निमित्त होते. फोन लावायला घेतला तर मोबाईलला रेंज नव्हती. सूर्य आता बराच वर आला होता उन्हात दुपारी फिरणं मला सध्या तरी शक्य नव्हतं. मी आज पूर्ण दिवस कॉटेज मधेच आराम करायचा ठरवलं. इथे रेंज मिळत नव्हती त्यामुळे इंटरनेटचा प्रश्नचं नव्हता. मी बॅग मधून पुस्तक काढलं आणि जिम कॉर्बेट चं man eaters of kumaon वाचायला सुरु केलं...

आज सकाळी अलार्म लावून लवकर उठलो, काल दिवसभर आराम करून सुद्धा रात्री लवकर झोप लागली हे माझ्यासाठी विशेषच होतं. आज सकाळी जंगलात जायचा चान्स मला हुकवायचा नव्हता. तरी सहाला निघायचे म्हणता म्हणता मला तयार व्हायला साडेसहा वाजले, राक्कु मात्र सकाळी बरोबर वेळेवर ठरल्याप्रमाणे तयार होता. आज माझी मेळघातील पहिली सफारी होती. साग वृक्षांच्या मधून आमची जिप्सी चालली होती. अधून मधून चितळांचे कळप दिसत होते. राक्कुने मधेच एका झाडाच्या शेंड्यावर बसलेला तुरेवाला सर्पगरुड दाखवला. पुढे गव्यांच्या भरभक्कम कळपाने आमच्या समोर रस्ता ओलांडला. राक्कु बरेच पक्षी प्राणी दाखवत होता. त्याला ते सहज दिसत होते. मला मात्र काळजीपूर्वक पहावे लागे.

तू C1 बघितला का रे? मागच्या आठवड्यात एकदा स्पॉट झालेला.

तो आलाय खरा. पण नंतर कुणाला काय दिसला नाय राक्कुने सांगितले.

आता ऊन वाढायला लागलं होतं आम्ही 10.30ला सीमाडोहला परतलो. नाश्ता केला आणि मग कॉटेजच्या बाहेर वेताच्या खुर्च्या ठेवलेल्या होत्या तिथे बसून मी पुन्हा जिम कॉर्बेट हातात घेतला. तितक्यात आवाज आला,

मेळघाटात आला आणि मला विसरलाच वाटतं समोर सुरुची उभी होती.

अगं तुला कसा विसरेन मी?

मग काय इथे आल्यापासून एक फोन नाही केला तू आणि पवन कुठंय??

तू बस आधी सांगतो सगळं तुला म्हणत तिला पवनच्या सगळया करामती सांगीतल्या आणि फोनच विचारशील तर मोबाईलला रेंज नाहीये आणि इथल्या लॅंडलाईनची वायर कट झाली आहे. हे सर्व सांगितल्यावर कुठे तिने उसासा सोडला.

विदर्भातल्या उन्हाने सुरुचीला चेहरा चांगलाच लाल झालेला. तू आराम कर थोडा वेळ थकली असशील ना?

हो रे रात्री ट्रेनमध्ये नीट झोपच नाही झाली आता थोडावेळ झोप काढते मी मग बोलू आपण म्हणत सुरुची झोपायला आत गेली. मी पुन्हा पुस्तक हातात घेतलं पण लिंक लागत नव्हती. माझ्या मनात विचारचक्र सुरु झालं माझा भूतकाळ हा माझ्यासाठी नेहमीच प्रश्न म्हणून उभा असायचा. भूतकाळातील अनेक दुःख आणि विरह हे मला आत्ता अचानक आठवत होते. माझ्यासमोर अनेक प्रश्न होते जे मला सतावत असत पण विचारणार कुणाला हा एक नवीन प्रश्न होता. सुरुची ही एकच व्यक्ती होती जिच्याशी मी मनातल्या बऱ्याच गोष्टी बोलू शकायचो, सगळया नाही बऱ्याच..... पवनशी कधी बोलू शकलो नाही. तो असताना या प्रश्नांची किंवा उत्तरांची मला कधी गरजच वाटली नाही.....

जेवण करायला जायचं का सुरुचीचा आवाज आला आणि माझं विचारचक्र भंग पावलं

सिपनेच्या किनाऱ्यावर आम्ही दोघंच बसलो होतो. समोर सिपनेचा हळुवार प्रवाह वाहत होता आणि त्यात पाणझड होऊन पडलेली पानं वाहत होती. समोरच्या झाडावर आता मोजण्याइतकीच पानं शेंड्याला उरली होती. बाकी सगळं झाड निष्पर्ण होतं. आमच्या मधली शांतता भंग करत मी सुरुचीला विचारलं... बघ ना कित्येक दिवस असलेली पानांशी जवळीक आज फांद्यांपासून अलगद वेगळी झालीय. कसलाच आवाज नाहीये त्यात. हे नातं तुटण्याचा त्रास त्यांना होत नसेल का. इतकं मोठं झाड पण पानांविना किती भकास आणि उदास वाटतंय.

काही क्षण पुन्हा शांततेत गेले आणि मग सुरुची म्हणाली पुन्हा पालवी फुटेल आणि झाड पुन्हा बहरेल, जर मागचं काही सोडलच नाही तर बहर बहरेल तरी कसा? विचार करत मी म्हणालो पण जर मागचं सगळंच सोडलं तर आपल्या जवळच्यांशिवाय बहरण्याला अर्थ तरी काय?

सगळं कधीच सुटत नाही पानं झडलीयेत फांद्या तश्याच आहेत. साथ पानांनी सोडली वृक्षाची, त्यातच अडकून राहिलं तर बहर मिळणार नाही, जी पानं जातील त्यांना सहजतेने जाऊ दिलं आणि फांद्या व मुळासह भक्कम राहिला तरच वृक्ष बहरेल त्यावेळी फक्त नवीन पानचं नाही तर फळ आणि पक्षी पण असतील या वृक्षावर, वाट फक्त बहाराच्या मौसमाची आहे.. मेळघाटावर मावळतीचे रंग पसरत होते आणि माझ्या मनात सुरुचीने नवीन विचारांचा उदय केला होता....

माझं मन समजण्याची आणि त्याला दिशा देण्याची ताकद सुरुची मधेच होती. आमचं नातं नेमकं काय होत? मला माहित नव्हतं पण ज्या भावना तिच्याबाबतीत होत्या त्या इतर कुणासाठीच कधी वाटल्या नाही मला.

तीही जितकं माझ्याशी मोकळेपणाने बोलायची, तितकं इतरांशी बोललेली मी पाहिलं नव्हतं. आमची भेट अशीच कधीतरी व्हायची, पण ती परिपूर्ण असायची. तिला पण आपल्याबद्दल असंच वाटत असेल काय?

आता रात्रीचा 1 वाजला होता मी झोपायचा खुप प्रयत्न केला पण सुरुचीच्या विचारांनी माझा पाठलाग सोडला नाही. तिलाच विचारू का तिला काय वाटतं ते? ती नक्की समजून घेईल माझी घालमेल. नेहमी तीच तर समजून घेते.. मी निर्धाराने उठलो दरवाजा उघडला आणि बाजूच्या खोलीचं दार वाजवलं तिचा घाबरा आवाज आला कोण आहे? ? अगं घाबरतेय काय मीच आहे उघड ना दार... माझा आवाज ऐकून तिने हलकेच दार उघडलं अरे किती वाजलेत? कधीही काय दार वाजवतो तू? ती त्रासिक स्वरात म्हणाली.. मी सगळा घटनाक्रम एका दमात सांगीतला. सुरुची तू मला खरंच आवडतेस. तुला मी..? ?

आपण नंतर बोलू ही वेळ नाहीये म्हणत तिने दरवाजा बंद केला, मी पुन्हा माझ्या खोलीत गेलो. आता तर मी अस्वस्थ झालो होतो जे केलं ते चूक कि बरोबर हे कळत नव्हतं. खिडकीचे पडदे बाजूला सारून विषण्ण होऊन बाहेर बघू लागलो. आकाशात पौर्णिमेचा चंद्र चकाकत होता त्या चंद्रप्रकाशात जंगल न्हाऊन निघालं होतं. मी विचारमग्न असतानाच पलीकडे झाडात हालचाल झाली बघतो तर एक अस्वल झाडीतून पुढे आलं. ते माझ्याकडेच बघत होतं. मी त्याच्याकडे पाहत असतानाच विचार आला- जर आपण बाहेर गेलो तेव्हा जर हे अस्वल आलं असतं तर? त्या विचारानेच मी गलितगात्र झालो. प्रेमात माणूस आंधळा होतो म्हणतात हेच खरं आहे. जमीन हुंगत अस्वल निघून गेलं आणि विचार करत करत मी झोपी गेलो

सकाळी 9 वाजता दार वाजलं तेव्हा मी उठलो. दार उघडतो तर बाहेर राक्कु होता.

तू आहेस होय?

हो तुम्हाला कोण वाटलं?

मला वाटलं सुरुची आहे काल आली होती ना ती. मी म्हणालो.

त्या मॅडम सकाळीच निघून गेल्या checkout करताना दिसल्या मला... आपल्याला जंगलात जायच ना? ?? राक्कुने माझा चेहरा पाहत विचारले...

आज नको

कितीतरी वेळ मी सिपनेच्या किनाऱ्यावर असलेल्या अर्जुन वृक्षाखाली बसलेलो होतो. माझ्या मनात कसलाच भाव नव्हता मला मी केलेल्या कृत्याबद्दल काहीच चूक वाटत नव्हतं ना मला सुरुचीचा राग आला होता. तिने केलं ते योग्य होतं. ती मला माझ्या भूतकाळासह मित्र म्हणून स्वीकारू शकत होती. पण life partner म्हणून नाही. ती तिच्या दृष्टीने बरोबर होती. आता मला समजून घेणारं अस कुणीच उरलं नव्हतं. ती कमी मी स्वतःच पूर्ण करायची ठरवलं. आता सुरुचीचा जितका विचार करू तितका मी अस्वस्थ होईल आणि पुन्हा गुरफटत जाईल हे माहिती होतं. याच सिपनेच्या किनाऱ्यावर तिने मला सांगितलेलं. जर मागचं काही सोडलंच नाही तर बहर बहरेल तरी कसा? मी बाकी सगळं सोडून बघत होतो. समोरचा सिपनेचा प्रवाह आणि हे अवाढव्य जंगल. तितक्यात बाजूच्या झाडावरून एक उडणारी खार झेपावलेली मी पहिली, शांतपणे बसून मी पहिल्यांदाच अरण्यवाचन केलं. कॉटेज वर परतल्यावर पुन्हा विचार आला इतकं सगळं होऊनही आज मी स्थिर कसा काय राहिलो? जणू काही मी या अरण्याचा एक भाग झालो होतो. मेळघाटाने मला आपलेसे केले होते आणि मी मेळघाटाला......

मेळघाट आज शांत आणि निरव होता. आमची गाडी जंगलवाटेतून संथपणे पुढे चालली होती, पुढे ड्रायव्हर आणि राक्कु बसले होते दोघेही कोरकू आदिवासी. गाडीत एकदम शांतता

होती, अगदी क्वचित एखाद दुसरं वाक्य ते दोघं कोरकू भाषेत एकमेकांशी बोलत होते. त्यातलं मला काही कळतं नव्हतं. मी बाहेर जंगल पाहण्याचा प्रयत्न करत होतो पण आज एकही प्राणी पक्षी दिसत नव्हता. हे अगदीच अनपेक्षित होतं जैवविविधतेने इतकं समृद्ध जंगल आणि आज काहीच कसं काय दिसतं नव्हतं? माझं मन परत मागे वळालं होतं, सुरुची आणि पवन बरोबर असते तर? खुप कमी लोकं असतात ज्यांची साथ हवीहवीशी वाटते. त्यांना आपण कधीच कंटाळत नाही असं का होतं माहिती नाही. पण असं होतं हे मात्र नक्की. माझ्या जीवनात असे सुरुची आणि पवन हे दोघेचं होते आणि त्याचबरोबर आता हा मेळघाट सुद्धा, पहिल्याच भेटीत आपलंसं करणारा.. काय असेल नेमका आमच्यात समान धागा जो एकरूपता आणतो? मी विचार करत होतो.

तितक्यात दुसरी एक जिप्सी आम्हाला क्रॉस होतं थांबली, गाडीत दोन तीन हौशी पर्यटक dslr कॅमेरे घेऊन बसले होते... वाघ दिसला का हो? पलीकडून आवाज आला,

नाही आज कुठलाच प्राणी नाही दिसला - मी.

अरे यार इतकं फिरून पण काय फायदा नाही झाला त्यांच्या आवाजात निराशा होती.

जंगल हे असंच असतं साहेब unpredictable-लहरी.. मी नकळत त्यांना उत्तर दिलं आणि आम्ही पुढे निघालो.

Unpredictable लहरीपणा हाच तो धागा होता. मी सुरुची, पवन आणि मेळघाट चौघही लहरी होतो. अगदी आपल्या आयुष्यासारखेच. आजचं मेळघाटाने लहरीपणा दाखवून उत्तर दिले होते. माझ्या मनातला असला नसलेला सगळा विषाद दूर झाला होता. मेळघाटाच्या जंगलाने न बोलता बरीच उत्तरं मला दिली होती.... गाडी परत फिरवा मी ड्रायव्हरला सांगितले, राक्कु माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेने बघत म्हणाला अजून तर काहीच पाहिले नाही.. आणि तुम्ही तर C1 बघायला आलात ना? मी हसत म्हणालो जंगल पाहिलं मी आज.. आता परत जायची वेळ झाली निघायला हवं..

राक्कु अजूनही संदिग्ध नजरेने पहात होता आणि आमची गाडी परत सेमाडोहच्या दिशेने निघाली होती

मी कोण? माझा भूतकाळ काय? सुरुची पवन आणि माझी भेट कशी झाली? आणि माझी मेळघाटाची पुढची भेट, सगळी उत्तरे पुढच्या भागात...